
स्वप्न - द्वंद्व गीत
तीः- सांग माझ्या डोळ्यात तुजला, काय दिसते सांग ना
तुझ्या मनीचे स्वप्न दिसते, रंगले का सांग ना ॥ १ ॥
तोः- नेत्रांजनासम बिलगूनी तू, असतेस माझ्या लोचना
दिसलीस ना जर दिवस एक, जगण्यास काही अर्थ ना ॥ २ ॥
तीः- पहा जरा निरखुनि डोळ्यात, काय दिसते सांग ना
वर्तमान प्रेममय कि, सुरेख भविष्य आपुले सांग ना ॥ ३ ॥
तोः- पाहतो उतरुनी तयात, खोली मज तरीही कळेना
समजते इतुकेच खोली जितकी, प्रेम तितुके जीवना ॥ ४ ॥
तीः- दिसते तुला जे सुरेख, नेत्रात जपुनी ते ठेव ना
डोळ्यात तुझिया बिंब त्याचे, दे मला हळूच पाहण्या ॥ ५ ॥
तोः- ये अशी जवळ पहा, नको वेळ उगा दवडू ना
पापण्या मिटुनी स्वप्न, हृदयात अलगद ठेव ना ॥ ६ ॥
- ©सचिन पु. कुलकर्णी
www.saarthbodh.com
FB ID - sachin.kulkarni78